## L. A. BILL No. XXXVIII OF 2021.

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STAMP ACT.

### सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८.

### महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.

**(विधानसभेने दिनांक २७ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी शिफारशींशिवाय परत केल्याप्रमाणे.)**

१९५८ चा ६०.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ५ ऑगस्ट २०१६ पासून अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

१९५८ चा ६०.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम २ मध्ये, खंड (ग) मधील, उप-खंड (चार) मधील, " भारतीय रिझर्व्ह बँकेचा प्रत्येक आदेश " या मजकुरानंतर पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

एचबी १८८१-१

" आणि आजारी औद्योगिक कंपन्या (विशेष उपबंध) अधिनियम, १९८५, याच्या कलम १८ किंवा १९ अन्वये औद्योगिक व आर्थिक पुनर्रचना मंडळाने, त्यात विनिर्दिष्ट केलेल्या योजनेच्या मंजुरीच्या बाबतीत दिलेला प्रत्येक आदेश किंवा नादारी व दिवाळखोरी संहिता, २०१६, याच्या कलम ३१ अन्वये राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने वियोजन आराखड्याच्या मंजुरीच्या बाबतीत दिलेला प्रत्येक आदेश".

१९८६ चा १.

२०१६ चा ३१.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या अनुसूची एकची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमास जोडलेल्या अनुसूची एक मध्ये, स्तंभ (१) मधील, अनुच्छेद २५ मधील, खंड (डअ) मधील " भारतीय रिझर्व्ह बँकेच्या आदेशाशी संबंधीत असेल तर " या मजकुरानंतर, पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

" आणि आजारी औद्योगिक कंपन्या (विशेष उपबंध) अधिनियम, १९८५, याच्या कलम १८ किंवा १९ अन्वये औद्योगिक व आर्थिक पुनर्रचना मंडळाने, त्यात विनिर्दिष्ट केलेल्या योजनेच्या मंजुरीच्या बाबतीत दिलेल्या प्रत्येक आदेशाशी किंवा नादारी व दिवाळखोरी संहिता, २०१६, याच्या कलम ३१ अन्वये राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने वियोजन आराखड्याच्या मंजुरीच्या बाबतीत दिलेल्या प्रत्येक आदेशाशी संबंधित असेल तर ".

१९८६ चा १.

२०१६ चा ३१.

विधिग्राह्यीकरण.

**४.** (१) कोणत्याही न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यांमध्ये किंवा मुख्य अधिनियमामध्ये एतद्‌विरूद्ध काहीही अंतर्भूत असेल तरीही, मुख्य अधिनियमाच्या अनुसूची एक मधील अनुच्छेद २५ च्या तरतुदींन्वये निर्धारित केलेले, बसविलेले व वसूल केलेले मुद्रांक शुल्क, उक्त अधिनियमाखालील प्राधिकाऱ्यांनी असे निर्धारण, बसवणे व वसुली करण्याच्या अनुषंगाने केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कारवाई, यासंह, हे जणू काही महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२१ (यात यापुढे या कलमात ज्याचा निर्देश " सुधारणा अधिनियम " असा केला आहे), याद्वारे सुधारणा केलेल्या उक्त अनुच्छेद २५ च्या तरतुदी सर्व महत्त्वाच्या वेळी निरंतर अंमलात होत्या असे समजून, कायद्यानुसार विधिग्राह्यरीतीने बसविण्यात व वसूल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार,—

२०२१ चा महा....

(अ) मुद्रांक शुल्क बसविण्याच्या व ते वसूल करण्याच्या संबंधात मुख्य अधिनियमाअन्वये प्राधिकाऱ्यांनी केलेल्या किंवा हाती घेतलेल्या सर्व कारवाया, कार्यवाह्या किंवा गोष्टी, सर्व प्रयोजनांसाठी, मुख्य अधिनियमाच्या तरतुदींनुसार करण्यात आल्या किंवा हाती घेण्यात आल्या असल्याचे मानण्यात येईल ;

(ब) अशा प्रकारे बसविलेल्या आणि वसूल केलेल्या मुद्रांक शुल्काच्या परताव्यासाठी उक्त प्राधिकाऱ्यांविरूद्ध कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा किंवा इतर कार्यवाही दाखल करता येणार नाही किंवा चालवता येणार नाही ;

(क) कोणतेही न्यायालय किंवा इतर कोणतेही प्राधिकरण, अशा प्रकारे बसविलेल्या किंवा वसूल केलेल्या मुद्रांक शुल्काचा परताव्याचा निदेश देणाऱ्या कोणत्याही हुकूमनाम्याची किंवा आदेशाची अंमलबजावणी करणार नाही.

(२) शंकानिरसनार्थ, याद्वारे, असे घोषित करण्यात येते की, पोट-कलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे, एखाद्या व्यक्तीला,–

(अ) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या मुद्रांक शुल्काच्या कोणत्याही आकारणीस, पुनर्आकारणीस, बसवणीस किवा वसुलीस, सुधारणा अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींनुसार हरकत घेण्यास ; किंवा

(ब) सुधारणा अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या, मुख्य अधिनियमान्वये मुद्रांक शुल्काच्या स्वरुपात तिच्याकडून देय असलेल्या रकमेपेक्षा, मुख्य अधिनियमान्वये तिने अधिक भरणा केलेल्या कोणत्याही मुद्रांक शुल्काच्या परताव्याची हक्क मागणी करण्यास,

प्रतिबंध होतो, असा अन्वयार्थ लावण्यात येणार नाही.

(शा.म.मु.) एचबी १८८१–२ (५००-१२–२०२१)

## महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**[ सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८. ]**

**[ महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[ श्री. बाळासाहेब थोरात,**
महसूल मंत्री. **]**

**[ विधानसभेने दिनांक २७ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे .]**

**[ विधानपरिषदेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी शिफारशींशिवाय परत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई